| | | |
|---|---|---|
| | | पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली जनसंपर्क शाखा<br>P.R.O Office, Gadchiroli<br>**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli<br>**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com |

# वार्तापत्र

दिनांक २३/०१/२०२०

## उपविभाग भामरागड येथे " भव्य आदिवासी रेला नृत्य कला स्पर्धा" संपन्न

मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा्गे., मा. अपर पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग सा्गे., मा. अपर पोलीस अधिक्षक, अहेरी श्री. मनिष कलवानिया सा्गे., व श्री. कुणाल सोनवणे सा्गे. उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड यांचे मार्गदर्शनाखाली उपविभाग भामरागड स्तरावर **"भव्य आदिवासी रेला नृत्य स्पर्धेचे"** आयोजन करण्यात आले होते.

सदर स्पर्धेमध्ये प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. दुर्गे सर मुख्यध्यापक भगवंतराव आश्रम शाळा, भामरागड, श्री. गुट्टे सर मुख्यध्यापक जय पेरसापेन आश्रम शाळा भामरागड श्री. सय्यद मुख्यध्यापक जय पेरसापेन आश्रम शाळा भामरागड, श्री. शब्बर मोगल बेग नगर सेवक नगर पंचायत भामरागड, श्रीमती संगीता गाडगे नगराध्यक्ष नगरपंचायत भामरागड, श्रीमती बसंती मडावी नगर सेवक नगरपंचायत भामरागड श्री ज्ञानेश्वर झोल पोलीस उपनिरीक्षक, पोस्टे भामरागड, श्री. गजानन कर्णेवाड पोलीस उपनिरीक्षक, उपविभागीय पोलीस अधि. कार्यालय भामरागड, श्री. सुरज सुसतकर पोलीस उपनिरीक्षक, पोस्टे भामरागड, श्री. कराळे सा्गे. पोलीस उपनिरीक्षक, पोस्टे भामरागड, श्री. धनाजी होनमाने पोलीस उपनिरीक्षक, क्युआरटी भामरागड तसेच भामरागड येथील प्रतिष्ठीत नागरीक व इतर मान्यवर सदर कार्यक्रमास उपस्थित होत. पोस्टे भामरागड, पोमके धोडराज, पोमके ताडगाव, पोमके नारगुंडा व पोमके कोठी असे उपविभागा भामरागड डीव्हीजन मधील पोस्टे/पोमके चे एक-एक संघ सहभाग घेतले होते. सदर स्पर्धेमध्ये पोस्टे भामराड येथील जय पेरसापेन आश्रम शाळा भामरागड संघाने प्रथम क्रमांक पटकाविला असुन पोमके नारगुंडा येथील हलवेर संघानी व्दितीय तर पोमके कोठी येथील शासकिय आश्रम शाळा कोठी संघानी तृतिय क्रमांक पटकाविला. सदर विजेत्या संघाला प्रथम ७,०००/- रु. , व्दितीय ५,०००/- रु. व तृतिय ३,०००/- रु. रोख पारितोषीक व प्रमाणत्र देवुन गौरविण्यात आले. भव्य आदिवासी रेला स्पर्धेला भामरागड हद्दीतील ४०० ते ५०० नागरिकांच्या जनसमुदाय होते. स्पर्धेदरम्यान स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. सदर कार्यक्रमामध्ये श्री. दुर्गे सर, श्री. सय्यद सर, श्रीमती बसंती मडावी नगर सेवक नगरपंचायत भामरागड यांनी पर्यवेक्षक म्हाणुन काम पाहीले.

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पोस्टे भामरागड येथील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी तसेच एसआरपीएफ चे अधिकारी/कर्मचारी यांनी उत्कृष्ट सहकार्य केले. त्याच प्रमाणे वर्षानुवर्ष नांदत आलेल्या पारंपारीक आदिवासी रेला नृत्य कलेला पोलीस विभागातर्फे प्रत्साहन मिळवुन दिल्याने परीसरातील नागरीकांनी आनंद व्यक्त कले.

